आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक ११ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. येत्या तीन वर्षांत देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात डे केअर कॅन्सर सेंटर उघडण्यात येणार.

2. अमरावती विभागात सिंचन समृद्धी होणार सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यांना होणार लाभ.

3. नागपूर पोलीसांतर्फे "मिशन जीवन रक्षा" रास्ते सुरक्षा विषयक नवीन उपक्रम सुरु.

4. मध्य रेल्वे नागपूर विभागातून होळी विशेष ट्रेन चालविण्यात येणार.

---

कर्करोग शुश्रुषा केंद्र

केंद्र सरकार पुढील तीन वर्षांत, देशातल्या प्रत्येक जिल्ह्यात कर्करोग शुश्रुषा केंद्र उघडणार आहे. राज्यसभेत आज एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना, केंद्रीय आरोग्य मंत्री, जे.पी. नड्डा यांनी ही माहिती दिली. २०२५-२६ मध्ये, दोनशे शुश्रुषा केंद्र उघडले जातील असं त्यांनी सांगितलं. आयुष्मान भारत-पीएम जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीमुळ, कर्करोगाच्या रुग्णांवर तपासणीनंतर, ३० दिवसांच्या आत उपचार सुरू होतात. तसंच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत, सरकार परवडणारी आणि दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी, काम करत असल्याचं, नड्डा यांनी नमूद केलं.

*(नेशनल हेल्थ मिशन के तहत हेल्थ को हम अफोर्डेबल एक्सेसिबल और उसके साथ साथ इक्विटेबल बनाने के लिए हम क्वालिटी हेल्थ केयर देने का प्रयास एन. एच. एम. के माध्यम से कर रहे हैं और उसमें हम बहुत तरीके की सपोर्ट कर रहे हैं। टेक्निकल सपोर्ट भी कर रहे हैं। मैन पावर सपोर्ट भी कर रहे हैं। फाइनेंशियल सपोर्ट भी कर रहे हैं।)*

दरम्यान, बनावट मतदार ओळखपत्राच्या मुद्यावरुन, विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळ, राज्यसभेचं कामकाज काही वेळासाठी बाधित झालं होतं. सकाळी कामकाज सुरु होताच, यासंदर्भात विरोधकांनी दिलेला स्थगन प्रस्ताव, उपसभापती

हरीवंश यांनी फेटाळून लावला. त्यामुळ काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रविड मुनेत्र कळघम, आम आदमी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यामुळ सदनाचं कामकाज, १२ वाजेपर्यंत स्थगित झालं होतं.

------------------------------------

सिंचन समृद्धी

राज्यातील बहुप्रतिक्षीत वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळ, रखरखत्या परिसरात सिंचन समृद्धीचा नवा महामार्ग गवसणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. काल राज्य सरकारनं सादर केलेल्या बजेटमध्ये, सी.एम. फडणवीसांच्या महत्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला, तत्वतः मान्यता दिली. त्यामुळे अमरावती विभागातील, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ या चार जिह्यात, प्रस्तावित कालव्यांमधून, हरितप्रदेश अस्तित्वात यावा अशी आस, शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.या प्रकल्पाच्या माध्यमातून भंडारा जिल्ह्याच्या, गोसेखुर्द प्रकल्पातील पाणी नदीजोड कालव्याद्वारे बुलढाणा जिल्ह्याच्या नळगंगा प्रकल्पात सोडले जाणार आहे.सहा जिल्ह्यात सिंचने लाभ, सुमारे ४२६.५२ किमी लांबीच्या या कालव्याच्या माध्यमातून, विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा अशा सहा जिल्ह्यांत, सिंचन समृद्धी आणली जाणार आहे. या पाण्याचा १५ तालुक्यांतील तीन लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्राला, सिंचनाचा लाभ होणार आहे.यासोबतच पिण्यासाठी आणि औद्योगिक वापरासाठीही हे पाणी उपयोगी ठरणार आहे.

------------------------------------

अपघात नोंदी

महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांत, एक लाखापेक्षा जास्त रस्ते अपघातांची नोंद झाली असून, त्यात जवळपास ४६ हजार जणांचा, मृत्यू झाल्याची माहिती, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज, विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली. २०२२ ते २०२४ या कालावधीत, अपघातांच्या संख्येत सातत्यानं वाढ झाल्याचं, सरनाईक यांनी दिलेल्या आकडेवारीतून दिसून येत आहे.वाहन चालकानं मद्यपान केलं आहे का, याची चाचणी करणाऱ्या यंत्रांसोबतच, त्यांनी, अन्य अंमली पदार्थांचं सेवन केलं आहे का, हे देखील तपासणारी यंत्रं मागवण्याची प्रक्रिया, राज्य सरकार राबवत असल्याचं, सरनाईक यांनी सांगितलं.राज्यानं अद्याप महामार्गांवर, इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम लागू केलेली नसल्याचंही, त्यांनी नमूद केलं.

------------------------------------

रोजगार मेळावा

नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाद्वारे रेशीमबाग मैदानात आयोजित महिला उद्योजिका मेळाव्यात काल लाडकी लेक भव्य रोजगार मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. यासाठी महिला उमेदवारांकडून या मेळाव्याकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. यात 1830 महिला उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केले. त्यापैकी 252 महिला उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले. 289 महिलांना 2nd round करीता short Lists करण्यात आले. 5 मार्च पासून सुरू असलेल्या या मेळाव्यात भेट देणाऱ्या एका महिलेने आपला अनुभव संगीतला ---

*आम्ही इथल्या मेळ्यांमध्ये आज आलेले आहोत विविध स्टॉल वगैरे सगळे दागदागिने, साड्याचं ,कपड्यांचं सगळ्या आणि कार्यक्रमाचे सगळे पाहून आम्ही भारावून गेलेला आहे आणि आम्हाला असं वाटतं. आम्ही सतत इथे आलो पाहिजे आणि या कार्यक्रमात सहभागी झाल पाहिजे अशी आमची इच्छा आहे आणि आम्हाला हे सगळं पाहूनच चांगलं आणि इथल्या लोकांनी जे लावलेल आहे मेहनत घेतली आहे सगळ्यांनी त्यांच्या आम्हाला खूप कौतुक वाटते.*

---------------------------------------

शहरबस सेवा बंद

आगामी होळीचा सणा निमित्य 13 मार्च रोजी सांयकाळी सात वाजता पासून १४ मार्चला संपुर्ण दिवस शहरबस सेवा बंद राहील. 15 मार्च पासुन बसेसची वाहतुक, पुर्ववत सुरु राहील असं, नागपूर महानगर पालिकेतर्फे, कळविण्यात आलं आहे.

---------------------------------------

छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन

छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त आज, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, विधान भवनात, संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला, पुष्प अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी, विधान परिषद सभापती, राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष, राहूल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री अतुल सावे, विधान परिषदेचे, विरोधी पक्षनेते, अंबादास दानवे यांनीही, संभाजी महाराजांच्या प्रतिमेला, पुष्प अर्पण करून, अभिवादन केलं.

---------------------------------------

मिशन जीवन रक्षा

नागपूरचे पोलीस आयुक्त, डॉ.रवींद्र कुमार सिंगल यांनी एक नवीन उपक्रम "मिशन जीवन रक्षा" सुरू केला आहे. या उपक्रमाचा उद्देश, रस्त्यावरील प्राणघातक अपघात

कमी करणे आणि लोकांच्या जीवाची रक्षा करणे हा आहे. रस्ते आणि अपघात यामध्ये होणाऱ्या मृत्यूमध्ये, दरवर्षी १०% घट करण्याबाबत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.यासाठी वाहतुकीचे योग्य नियमन, वाहतुकी विषयी जनजागृती, नो हँकिंग मोहिम, शहरातील डार्क झोन दूर करणे, सीसीटीव्ही कार्यप्रणाली अधिक सक्षम करणे, कमांड कंट्रोल सेंटर प्रभावीपणे कार्यान्वित करणे या विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत.सामान्य लोकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी "मिशन जीवन रक्षा" प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. आपण सर्वांनी मिळून "मिशन जीवन रक्षा" हे यशस्वी करूयात!, "कारण घरी कोणी तरी वाट पाहत आहे!" असं प्रतिपादन पोलीस आयुक्तांनी केलं.

------------------------------------

होळी विशेष ट्रेन

प्रवाशांच्या सोयीसाठी आणि होळी सणाच्या काळातील अतिरिक्त गर्दीचा विचार करून मध्य रेल्वे प्रशासनाने चारलापल्ली ते दानापूर आणि मुजफ्फरपूर या मार्गांवर विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष गाड्या 1.3 पट विशेष शुल्क आकारासह धावतील आणि विविध महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा देतील.गाडी क्र 07709 चारलापल्ली - दानापूर होळी विशेष गाडी 9 मार्च आणि 19 मार्च 2025 रोजी फेऱ्या करेल तर गाडी क्र. 07710 दानापूर - चारलापल्ली होळी विशेष गाडी 11 मार्च आणि 21 मार्च 2025 रोजी रोजी फेऱ्या करेल. या दरम्यान ती नागपूरला थांबा घेईल. .गाडी क्र. 07711/07712 चारलापल्ली- मुजफ्फरपूर- चारलापल्ली होळी विशेष गाडी (6 फेऱ्या) करणार असून या दरम्यान ती नागपूरला थांबा घेईल.

------------------------------------

कापूस खरेदी

भारतीय कापूस निगम अर्थात सी.सी.आय.कडून, चालू कापूस हंगामात, किमान हमी दरानं कापूस खरेदी करण्यासाठी, नोंदणीची तारीख १५ मार्च आहे. अकोला जिल्ह्यात ११ केंद्रावर नोंदणी सुरू असून, जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतक-यांनी लाभ घेण्याचे आवाहन, अकोला जिल्हा उपनिबंधक, डॉ.प्रवीण लोखंडे यांनी केले आहे.३० सप्टेंबर रोजी चालू कापूस हंगाम संपत असून, किमान आधारभूत किंमत योजनेचा लाभ घेण्यासाठी १५ मार्चपूर्वी नोंदणी आवश्यक आहे. अकोला जिल्ह्यात बोरगाव मंजू, कापशी, निंबी, अकोट, चोहोट्टा बाजार, तेल्हारा, हिवरखेड, पारस, बार्शिटाकळी, महान आणि मूर्तिजापूर इथल्या ११ केंद्रावर, नोंदणी सुरू आहे.जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी, नोंदणी पूर्ण करून घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

------------------------------------

फॅशन वॉक

नागपूर पोलिसांनी महिला दिनाच्या निमित्तानं, काल, सुरेश भट्ट सभागृहात, महिला पोलीस कर्मचारी वर्गाकरिता, 'फॅशन वॉक' आयोजित केला होता. यावेळी पोलीस आयुक्त, डॉ.रवींद्र सिंगल यांनी, महिला पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांचा सत्कार केला.या निमित्तानं महिला पोलिसांची एक बाईक रैली सुद्धा काढण्यात आली. या जागृतीच्या माध्यमातून, ट्राफिक सेफ्टी नियमाचं पालन करण्याचं आवाहन करण्यात आलं.

------------------------------------